# --// प्रेस नोट //--

## एन डी पी एस मधिल १ वर्षापासुन वाकड पोलीस स्टेशन येथुन फरार व सराईत आरोपी शिताफीने ताब्यात घेवून त्याच्याकडुन एक लोंखडी कोयता व मारुती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट गाडी तसेच ९३०००/- रोख रक्कम असा एकुण ६,९३,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन चिंचवड तपास पथकाकडुन आरोपीला ठोकल्या बेड्या

मा पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड आयुक्तालय पुणे यांनी दिवाळी सणानिमत्त सायंकाळी चिंचवड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पायी पेट्रोलींग करणेबाबत आदेशीत केल्याने चिंचवड पोलीस स्टेशनचे मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो दिलीप शिंदे व तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक एन.जे. तलवाडे व पो हवा ७०१ तोडकर,पो हवा ११७७ आढारी,पो ना सोनपेठे, पो शि २१२१ शेख, पो शि २१३६ डोके, पो शि २६५३ माने, पो शि २६५५ भदाणे, पो शि ३६१६ खैरे, यांचेसह श्रीधरनगर चिंचवड पूणे. भागात पायी पेट्रोलींग करीत असताना एक इसम निळया रंगाची, काळया काचा असलेली मारुती सुझुकी कंपनीची स्वीफ्ट गाडीसह दिसला तो इकडे तिकडे कावऱ्या बाव-या नजरेने पाहत होता. तेव्हा आम्हास त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने आम्ही सदरची माहीती मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप शिंदे सो. यांना सांगीतली. त्याचवेळी आरोपी घाईघाईने पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना चिंचवड पोलीस स्टेशन तपास पथकाने सदर आरोपीस शिताफीने ताब्यात घेतले. त्यास नाव व पत्ता विचारता त्याचे नाव अशोक मरिबा तुपेरे वय-२४ वर्षे धंदा व्यवसाय रा.म्हातोबानगर झोपडपट्टी, वाकड पूणे.असे सांगीतले.

त्याची दोन पंचासमक्ष अंगझडती केली असता त्याच्याकडे एक लोंखडी कोयता व ९३,०००/- रुपये रोख रक्कम करुन जप्त करुन चिंचवड पोलीस स्टेशन येथे आणून सखोल चौकशी करुन चिंचवड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं ५४०/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे दाखल करुन अटक करण्यात आली असून आरोपी हा वाकड पोलीस स्टेशन अभिलेखावर एन डी पी एस च्या **१) वाकड पोलीस स्टेशन गुरनं. ७८४/२०२२ भादवि कलम- ३५३,३३२ एनडीपीएस ॲक्ट ८ (क) २०(ब) (ii) (अ) २९ , २) वाकड पोलीस स्टेशन गुरनं. ६५९/२०२३ एनडीपीएस ॲक्ट ८ (क) २०(ब) (ii) (ब) २९ या दोन गुन्हयांत पाहीजे आरोपी** असुन त्यावर खालीलप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) वाकड पोलीस स्टेशन गु रजि नं. ११०९/२०१८ भा द वि कलम ३२४,३२३,५०४,३४
२) वाकड पोलीस स्टेशन गु.रजि नं. ९७१/२०१८ भादवि कलम- १४१,१४३,१४८,१४९,५०४
३) वाकड पोलीस स्टेशन गुरनं. ८४२/२०२१ एनडीपीएस ॲक्ट ८ (क) २०(ब) (ii) (अ) २९
४) वाकड पो स्टे गुरनं. ७८४/२०२२ भादवि कलम- ३५३,३३२ एनडीपीएस ॲक्ट ८ (क) २० (ब) (ii) (अ) २९
५) वाकड पोलीस स्टेशन गुरनं. ६५९/२०२३ एनडीपीएस ॲक्ट ८ (क) २०(ब) (ii) (ब) २९
६) वाकड पोलीस स्टेशन गुरनं. ३८७/२०२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम- १४२, आर्म ॲक्ट कलम- ४ (२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे
७) चिंचवड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं ५४०/२०२३ भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५ प्रमाणे

सदरची कामगीरी ही श्री विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री संजय शिंदे सो, सह पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, श्री वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, विवेक पाटील, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ पिंपरी चिंचवड, श्री विशाल हिरे सो, सहा. पोलीस आयुक्त सो चिंचवड विभाग, श्री दिलीप शिंदे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिंचवड पोलीस ठाणे, श्री प्रकाश जाधव सो, पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक एन.जे. तलवाडे व पोलीस हवालदार धर्मनाथ तोडकर,पोलीस हवालदार सागर आढारी, पोलीस नाईक सचिन सोनपेठे, पोलीस अंमलदार गोविंद डोके, पोलीस अंमलदार उमेश मोहीते,पोलीस अंमलदार रहिम शेख, पोलीस अंमलदार अमोल माने, पोलीस अंमलदार पंकज भदाणे, पोलीस अंमलदार राजेंद्र माळी, पोलीस अंमलदार सिधार्थ खैरे, यांनी केली आहे.